दिनांक ०५/०२/२०२४

# प्रसिध्दी पत्रक

1) आरोपी लोकसेवक श्री. प्रवीण लक्ष्मण पवार, महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय अंबड जिल्हा जालना (वर्ग-3) 2) श्री. खंडागळे, पुर्ण नाव माहित नाही, कोतवाल- वर्ग-4, तहसिल कार्यालय अंबड जिल्हा जालना यांनी तक्रारदार यांच्याकडुन रुपये. 50000/- लाचेची रक्कम मागणी केल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे गोंदी जि.जालना येथे भ्र.प्र.अधि. 1988 प्रमाणे गु.र.नं.40/2024 कलम 7, 12 |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | 1) आरोपी लोकसेवक श्री. प्रवीण लक्ष्मण पवार, महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय अंबड जिल्हा जालना (वर्ग-3)<br>2) श्री. खंडागळे, कोतवाल- वर्ग-4, तहसिल कार्यालय अंबड जिल्हा जालना. |
| लाच मागणी रक्कम | :- | 50000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | निरंक |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| सहाय्यक अधिकारी | :- | श्री. हरिदास डोळे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांची वाळु वाहतुकीची यापुर्वी पकडलेली गाडी सोडल्याचा मोबदला व यापुढे वाळु वाहतुकीची गाडी चालु देण्यासाठी व कारवाई न करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांची वाळु वाहतुकीची यापुर्वी पकडलेली गाडी सोडल्याचा मोबदला व यापुढे वाळु वाहतुकीची गाडी चालु देण्यासाठी व कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे आ.लो.से. क्रं. 1) श्री. प्रविण पवार यांनी 50,000/-रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 28/12/2023 व दि. 29/12/2023 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्र. 1 श्री लक्ष्मण पवार, यांनी तक्रारदार यांना रुपये 50,000/- ची मागणी केली. आलोसे क्र. 2 श्री खंडागळे यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम आलोसे क्र.1 श्री पवार यांना देण्या करीता प्रोत्साहीत केले बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे दि. 09/01/2024 व 10/1/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता आ.लो.से. श्री. प्रविण पवार यांना तक्रारदारची शंका आल्याने लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गोंदी जिल्हा जालना येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गु.र.नं.40/2024 कलम 7, 12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. मुकूंद आघाव, पोलीस उप अधिक्षक श्री. राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोहेकॉ. साईनाथ तोडकर, अशोक नागरगोजे, पो.अ. केवलसिंग घुसिंगे, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 8668752530

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर

Scanned with OKEN Scanner